J/78.

2017-18 Ext.

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Vidyawarta UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

# Vidyawarta®

International Multilingual Refereed Research Journal

Issue-26, Vol-02 April to June-2018

Editor
Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता

April To June 2018
Issue-26, Vol-02

Date of Publication
30 April 2018

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) Loneliness in Anita Brookner's Falling Slowly
**Dr. Vaibhav H. Waghmare, Solapur** || 70

15) लातूर जिल्ह्यातील मुस्लिम समाजाची व्यावसायिक रचना : एक भौगोलिक अभ्यास
आतार जे.एफ., डॉ.झोडगे एस.बी., सातारा || 75

16) संत जनाबाई आणि संत बहिणाबाई यांच्या साहित्यातील विविध विचार
औताडे बाळासाहेब गंगाधर, अहमदनगर. || 77

17) महाभारतातील स्त्री व्यक्तीरेखा-गांधारी
सौ. प्रणिता प्रभाकरराव देशपांडे , नागपूर. || 80

18) मराठाकालीन स्त्रियांचे कार्यकर्तृत्व व दर्जा
प्रा.डॉ.प्रशांत देशमुख , श्रीमती रेखा चिंतामण देवकर जळगाव || 82

19) साठोत्तरी काळातील एक अस्तित्ववादी कवी :
वसंत आबाजी डहाके, कु. रूपा घोनमोडे || 86

20) बालक्रीडेच्या अभंगाची पूर्वपिठीका
संत नामदेव. सौ. सविता जयंत मुळे ,नागपूर. || 89

21) निसर्गाच्या प्रतिबिंबीत करणारी
बालकवींची कविता, प्रा. रमेश बा. रिंगणे, गेवराई || 92

22) काळया आईवरील कविता
डॉ. पैकेकरी एस. पी.,अहमदनगर || 94

23) उच्च प्राथमिक स्तरावरील पाठ्यक्रमातून आपत्ती व्यवस्थापनासंबंधित घटकांवर पूरक
डॉ. सुषमावती जयवंत पाटील, नाशिक || 98

24) अष्टपैलू व्यक्तिमत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर
प्रा. डॉ. सौ. सुषमा विश्वरत्न तायडे, प्रा. डॉ. के. के. अहिरे,भुसावळ || 102

25) गडचिरोली जिल्हयाच्या स्थानिक इतिहासातील ऐतिहासिक स्थळे
प्रा.डॉ. नथ्थु सिताराम गिरडे, चंद्रपूर || 105

26) ग्रामीण साहित्य चळवळीचे स्वरूप व प्रभाव
प्रा.डॉ.राजकुमार रघुनाथ मुसणे,गडचिरोली || 108

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned by CamScanner

खज्या अर्थाने एका स्त्रीची योग्य मार्गाने जडण-घडण होणे आणि त्याचा मिळालेला मेवा, नवनीत म्हणजे याच गांधारीच्या आदर्शावर चालणारी चालती-बोलती पतिव्रता आपल्या सहवासात येणे घेणे

संदर्भ ग्रंथ सूची :-

१. महाभारत एक सुडाचा प्रवास :
दा.जी. पणशीकर

२. मानस रंग (स्त्रीयांचे ) :
डॉ. अनुराधा सोवनी उन्मेश प्रकाशन प्रथम आवृत्ती -१५ ऑगस्ट २०११

३. भारतीय नारी :
स्वामी विवेकानंद अनुवाद- कै. वि.रा. बनोडेकर

४. महाभारतातील व्यक्ती आणि शक्ती :
डॉ. माधव पोतदार (सुयोग प्रकाशन, पुणे )

❐ ❐ ❐

18

# मराठाकालीन स्त्रियांचे कार्यकर्तृत्व व दर्जा

संशोधन मार्गदर्शक
प्रा.डॉ.प्रशांत देशमुख
विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
अ.र.भा.गरुड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
महाविद्यालय, शेंदूर्णी, जि.जळगाव,मेहरुण, जळगाव

संशोधक विद्यार्थीनी
श्रीमती रेखा चिंतामण देवकर
इतिहास विभाग प्रमुख,
एच.जे.थीम कला व विज्ञान महाविद्यालय, मेहरुण, जळगाव

**********

**प्रस्तावना :-**

समाजातील स्त्रियांच्या दर्जावरच त्या समाजाच्या संस्कृतीचे श्रेष्ठत्व अथवा महत्व अवलंबून असते. स्त्रीला पुरुषांइतकेच हक्क, अधिकार असतील तर तो समाज उन्नत अथवा पुरोगामी आहे, असे मानले जाते. मात्र या विपरित परिस्थिती असेल तर त्या समाजास प्रतिगामी मानले जाते.

भारतीय संस्कृतीत स्त्रीला वैदिक काळापासून माता किंवा जननी म्हणून वंदनीय व पूजनीय मानले जात होते. प्राचीन भारतीय समाजजीवनात स्त्रीचे स्थान महत्वपूर्ण होते. परंतु कालौघात वेळोवेळी भारतावर परकीयांच्या झालेल्या आक्रमणामुळे येथील जनजीवन प्रभावित झाले. त्या अनुषंगाने परिस्थिती बदलत गेली. समाजव्यवस्थेतील तिचे स्थान व दर्जा घसरला. समाजजीवनातील एक दुर्बल घटक असाच दर्जा तिला प्राप्त झाला. स्त्रिया सामाजिक व कौटुंबिक जीवनात गुलामगिरीचे जीवन जगायला मजबूर झाल्या. अनेक सामाजिक व धार्मिक बंधनांच्या चौकटीत स्त्री बंदिस्त होती. स्त्रियांवरील बंधने, अन्याय व अत्याचाराला कुठलीही मर्यादा राहीली नव्हती. अशा या पार्श्वभूमीवर मराठाकालीन स्त्रियांचा दर्जा आणि कर्तृत्व यावर प्रकाश टाकतांना मध्ययुगीन दृष्टिकोनास आजच्या लोकशाही दृष्टिकोनातून मोजमाप लावणे संयुक्तिक होणार नाही. कारण तत्कालीन समाजाची रचना वेगळी होती. त्यांच्या गरजा, तत्वे, ध्येय तसेच समानतेच्या कल्पना ह्या फार



Scanned by CamScanner

वेगळ्या होत्या. या सगळ्या बाबींचा सारासार विचार करुनच मराठा कालखंडाकडे बघितले पाहिजे. त्याचवेळीस आपल्याला कल्पना येईल की, प्रतिकूल परिस्थितीतही या कालखंडात स्त्रियांनी संधी मिळताच आपले कर्तृत्व सिध्द केले आहे आणि म्हणूनच या शोध निबंधाद्वारे मराठा कालखंडातील सामान्य स्त्रियांचा समाजातील दर्जा आणि स्थान तसेच राजवंशातील, पेशवे घराण्यातील आणि सरदार घराण्यातील स्त्रियांनी गाजविलेल्या कार्यकर्तृत्वाचाही आढावा घेणार आहोत.

• मराठेकालीन स्त्री जीवन :-

अठराव्या शतकात हिंदु धर्माच्या दृष्टीने विचार केल्यास महाराष्ट्रात स्त्रियांचा दर्जा अत्यंत खालावलेला होता. अनेक सामाजिक-धार्मिक बंधनांच्या चौकटीत स्त्री बंदिस्त होती. तत्कालीन समाजातील रुढी व परंपरा तसेच पुरुषप्रधान संस्कृतीमुळे तिच्या वाटेला उपेक्षा येत होती. तिची अवस्था अतिशय दयनीय होती. कुटूंब प्रमुखाचे स्थान स्त्रियांना कधीच मिळाले नाही. तिला नेहमी दुय्यम दर्जा प्राप्त झाला. स्त्रियांना फारसे स्वातंत्र्य नव्हते. पितृसत्ताक समाजरचनेत स्त्रियांना कोणतेही हक्क वा अधिकार नव्हते. स्त्रियांना वडिलांच्या संपत्तीत कोणताही वारसा हक्क नव्हता. समाजातील चालीरीती, परंपरा, रुढी, नवससायास, व्रतवैकल्ये इ. चे पालन करणे स्त्रियांना बंधनकारक होते. बाह्य आक्रमणांमुळे त्यांना घराबाहेर पडण्यास मनाई होती. पडदा पध्दतीही या काळात सुरु झालेली होती.

• बालविवाह :

१८ व्या शतकात समाजात बालविवाहाची पध्दत अस्तित्वात होती. वयाच्या ६-७ व्या वर्षीच मुलीचा विवाह करण्यात येत असे. लग्नसमयी मुलीचे वय ८ किंवा ९ वर्षे तर मुलाचे वय १२ किंवा १३ वर्षे असे. मराठ्यांमध्येही बालविवाह पध्दत रुढ होती. इ.स. १६४० च्या अखेरीस छत्रपती शिवाजी राजांचे लग्न सईबाईशी झाले. त्यावेळेस शिवराय १० वर्षांतचे तर सईबाई ६ वर्षांच्या होत्या.१ येसूबाईचे लग्न झाले त्यावेळीस त्या ८ वर्षांच्या होत्या. नानासाहेब पेशव्यांचे गोपिकाबाईशी १७३० मध्ये लग्न झाले, त्यावेळेस नानासाहेब ८ वर्षांचे तर गोपिकाबाई ५ वर्षांच्या होत्या. मुलींचया लग्नाबाबत आईवडील अतिशय जागरुक असत. बालविवाह पध्दती ही फक्त स्त्रियांवरच बंधनकारक होती. पुरुषांवर मात्र कोणतेही विवाह विषयक बंधन नव्हते. त्यामुळेच विषमविवाह झालेले दिसून येतात.

• विषम विवाह :

१८ व्या शतकातील बाल विवाह पध्दती विवाहसमयी वराचे वय १२ ते १३ व वधूचे वय ७ ते ८ वर्षांचे असे, परंतु वर जर बिजवर (विधुर) असल्यास त्याचे वय जास्त असे. परंतु वधु मात्र ७ ते ८ वर्षांचीच असे. कारण त्याकाळात मुलींना त्यापेक्षा जास्त वयापर्यंत लग्नावाचून राहू देत नसत. पेशवे काळात तर हा अधर्म मानला जात असे.२ त्यामुळे वर हा वयाने प्रौढ, म्हातारा असला तरी त्याचा १०-१२ वर्षाच्या वधूसोबत विवाह होत असे. नानासाहेब पेशव्यांनी १७६१ मध्ये पैठण येथे वाखर या देशस्थ ब्राम्हण यांच्या मुलीशी विवाह केला. त्यावेळेस नानासाहेबांचे वय चाळीशीच्या आसपास होते. गोपिकाबाईसारखी कर्तीसवर्ती पत्नी हयात असतांनाही त्यांनी ८-९ वर्षांच्या लहान मुलीशी विवाह केला. तद्पश्चात २-४ महिन्यातच नानासाहेब स्वर्गवासी झाले.३

• बहुपत्नीत्व :

हिंदु धर्मशास्त्राचा तत्कालीन समाजावर फार मोठा प्रभाव होता. त्यामुळे धर्मशास्त्रानुसारच आचरण होत असे. त्यानुसार स्त्रीचा विवाह एकदाच हात असे. मात्र पुरुषांवर विवाहाच्या बाबतीत असे कोणतेही बंधन नव्हते. विशेष करुन राजवंशातील पुरुष अनेक वेगवेगळ्या कारणास्तव एकाहून अधिक विवाह करीत असत. तत्कालीन समाजात बहुपत्नीत्वाची चाल रुढ होती. शिवरायांनीही आठ विवाह केले होते.४ तर शाहू महाराजांनीही चार विवाह केले होते.५ नाना फडणीसांनी एकूण नऊ लग्ने केलीत. नानांचा मृत्यूझाला तेव्हा त्यांची पत्नी जिऊबाई ही ९ वर्षांची होती. पेशवा दुसरा बाजीरावाने एकुण अकरा लग्ने केली.६ तत्कालीन समाजात अशी अनेक उदाहरणे दिसतात. निव्वळ सत्ता व धनाच्या जोरावर स्त्रियांच्या भावभावनांचा कोणताही विचार न करता एकानंतर एक असे अनेक लग्न पुरुष करित असत. मात्र स्त्री फक्त एकदाच विवाह करु शकत असे. धर्मशास्त्रानुसार आणि प्रचलित रुढींनुसार पतीच्या मरणानंतरही स्त्रीला पतीशीच समर्पित राहावे लागे, परंतु हा नियम पुरुषांना लागू नव्हता.

• हुंडा पध्दत :

उच्च कुलीन वर्गामध्ये हुंड्याची प्रथा रुढ होती. काही जातींमध्ये वधुपिता स्वत: वराकडच्या मंडळींना काही मोठी रक्कम देत असे. आपल्या कन्येस चांगले सासर मिळावे, या हेतूने काही मुलींचे आईवडील ऐपत नसतांनाही मोठ्या प्रमाणात हुंडा देत असत. काही वेळा वरपक्ष स्वत: पैसा खर्च करुन विवाह संपन्न करुन घेत असत. दौलतराव शिदयांनी बायजाबाईंशी विवाह ह्याचप्रकारे घडवून आणला. वरपक्षाने वधुपक्षाकडून हुंडा आणि इतर मानपान स्विकारणे, हे श्रीमंतांच्या विवाह समारंभात चालत



Scanned by CamScanner

असे. परंतु साधारणत: मुलीला व्याज देण्याची पध्दत गरीबांच्या लग्नात चालत असल्याने या काळात गरीबांची लग्ने होणे अतिशय कठीण होते. या सर्व प्रकारात स्त्रियांच्या भावभावनांचा, आशा आकांक्षांचा विचार कोणीही, कुठेही करीत नव्हते.

• पुनर्विवाह :

काही उच्चकुलीन जाती सोडल्यास इतर क्षुद्र जातीमध्ये पुनर्विवाहास मान्यता होती. या पुनर्विवाहास 'पाट लावणे' असे म्हणत असत. काही खालच्या जात कुळींमध्ये पहिल्या नवज्याला सोडून दुसरा नवरा करणे हे सहज शक्य होते. कारण या जातकुळींमध्ये घटस्फोटास मान्यता होती. काही उच्च जात कुळांमधील स्त्रिया व ब्राम्हण जातवर्गातील स्त्रिया यांच्यापेक्षा या क्षुद्र जातीतील स्त्रियांना अधिक स्वातंत्र्य होते, त्यामुळे त्या आनंदी होत्या.

• सती पध्दत :

सती प्रथा प्राचीन काळातही काही प्रमाणात अस्तित्वात होती. महाराष्ट्रातील राजघराण्यांत, सरदार घराण्यात सतीची प्रथा रुढ होती. ही प्रथा अतिशय क्रूर होती. कारण पतीच्या मृत्यूनंतर पत्नीला त्याच्या चितेवर स्वत:ला जाळून घेऊन मरावे लागत असे. काही वेळा पती निधनानंतर स्त्रीला सती जाण्यास जबरदस्तीने भाग पाडत असत. तर काही वेळेस पतीबद्दलच्या अतीव प्रेमामुळे स्त्रिया स्वत:हून सती जात असत. तर काही धर्मशास्त्राच्या आज्ञेनुसार सती जात आणि काही वेळेस तर आपल्या पतीच्या चितेवर सती जाण्यापासून त्यांना लोकांकडून परावृत्त करण्याचाही प्रयत्न केला जात असे.७सती प्रथेला धार्मिक अधिष्ठान लाभल्यामुळे अधिक महत्व प्राप्त झाले. त्यामुळे सती जाणे म्हणजे धर्माला अनुसरुन पत्नी धर्माचे पालन करत वर्तन करणे, असा समज त्या काळातील स्त्रियांचा झालेला होता. १८ व्या शतकातील समाजात राजघराणे, पेशवे तसेच मराठे सरदार हे सुध्दा सती प्रथेला प्रोत्साहन देत. यास काही अपवादही दिसतात. इ.स. १६६४ ला शहाजी राजांच्या मृत्यूनंतर स्वत: जिजामाता सती जाण्यास निघाल्या होत्या. परंतु शिवरायांनी त्यांची मनधरणी करुन या विचारापासून त्यांना परावृत्त केले.८ नानासाहेब पेशव्यांच्या मृत्यूनंतर गोपिकाबाई सती गेल्या नाहीत तसेच रघुनाथराव पेशव्यांच्या पत्नी आनंदीबाई देखील सती गेल्या नाहीत. इ.स. १६८० ला शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांची फक्त एक पत्नी पुतळाबाई सती गेल्या.९ त्याचप्रमाणे छत्रपती राजाराम महाराज व छत्रपती शाहू महाराज यांच्याही एक-एक पत्नी सती गेल्या. सती जाणाज्या स्त्रीबद्दल समाजात आदराची व पूज्यतेची भावना होती. यावेळीस दानधर्मही केला जाई. पेशवा माधवरावांच्या मृत्यूनंतर रमाबाई सती जाण्यास निघाल्या, तेव्हा त्यांनी आपल्या दागिन्यांचा त्याग करुन त्यांचा दानधर्म केला. सती जाणाज्या स्त्रिला देवतेचा दर्जा दिला जात असे. त्यांना त्यागाचे प्रतिक मानले जाई. तिचे स्मारक उभारुन पूजा अर्चा केली जात असे. अहिल्याबाई होळकरांचे जावाई यशवंतराव फणसे यांच्या मृत्यूनंतर मुक्ताबाई ही सती गेली. अहिल्याबाईंनी आपल्या लेकीच्या स्मरणार्थ अतिशय सुंदर मंदिर उभारले व मुलीची आठवण चिरंतन ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.१० सती जातांना यातना जरी होत असल्या तरी दु:खी न होता आत्मिक व मानसिक मन:शांतीचा उपयोग करुन ह्या स्त्रिया सती जात असत.

• विधवांच्या हालअपेष्टा :

१८ व्या शतकातील समाजात बालविवाह, बहुपत्नीत्व, विषम विवाह अशा अनिष्ट प्रथांमुळे अनेक स्त्रियांना वैधव्य प्राप्त होत असे. धर्मशास्त्रानुसार पतीच्या मृत्यूपश्चात स्त्रीसमोर दोन मार्ग असत. एक तर स्त्रीने वैधव्य धर्माचे पालन करावे अथवा पतीसोबत सहगमन (सती) करणे. वैधव्य धर्माचे पालन करतांना अनेक प्रकारची बंधने तिच्यावर लादण्यात आलेली होती. तिने सन्यस्त वृत्तीने राहून नेहमी व्रतवैकल्ये, उपवास करावे. तिने सतत केशवपन करावे. अत्यंत खडतर जीवन जगावे. सर्वसामान्यत: विधवा स्त्रीची अवस्था अतिशय दयनीय होती. तिचे जीवन असहाय्य व यातनामय होते.

• नाटकशाळा :

तत्कालिन समाजात पुरुष अनेक विवाह करित असत. बिजवर, विधूर पुरुषांचा विवाह कमी वयाच्या मुलींशी होत असे. त्यावेळीस हे पुरुष 'अंगवस्त्र' बाळगत असत. या काळात राजवंशातील व सरदार घराण्यातील, पेशवे घराण्यातील उच्चभ्रू परिवारातील पुरुष अंगवस्त्र बाळगत असत. अंत:पुरातील या स्त्रियांना रक्षा, उपस्त्रिया, नाटकशाळा, मर्जी अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाई. रघुनाथ पेशवे हे त्यांच्या नाटकशाळांबाबत प्रसिध्द होते. दुसज्या बाजीराव पेशव्याच्या मर्जीतील अनेक स्त्रिया होत्या.

• देवदासी (मुरळी) प्रथा :

तत्कालीन समाजात नवससायास करण्याची प्रथा होती. त्या प्रथेतूनच देवदासी किंवा मुरळी ह्या निर्माण झाल्या. देवदासी किंवा मुरळी म्हणजे देवाला वाहिलेली स्त्री. ही प्रथा फक्त महाराष्ट्रात आणि दख्खनच्या काही भागात अस्तित्वात होती.११ महाराष्ट्रातील खंडोबा या देवतेला बोलून पहिले अपत्य अर्पण केले जात असे. पहिले अपत्य मुलगा असल्यास वाघ्या व मुलगी असल्यास मुरळी बनवून या मुरळीचे लग्न खंडोबाशी लावले जात



Scanned by CamScanner

असे. या मुरळींचे लग्न होत नसे. धर्माच्या नावाखाली या मुलींना दुराचार करण्यास भाग पाडले जाई.

• कुणबिणी :

१८ व्या शतकातील महाराष्ट्रात समाजातील राजे, उच्चभ्रू आणि श्रीमंत वर्गात दासदासी बाळगण्याची पध्दत होती. या दासींनाच कुणबिणी म्हणत. त्याचप्रमाणे कोणत्याही वयाच्या स्त्रीची खरेदी-विक्री होत असे. साधारणत: ५० ते १०० रुपयांपर्यंत त्यांची किंमत लावली जात असे. या क्षुद्र जातीतील स्त्रिया असत.१२ अशा अनिष्ट प्रथा आणि परंपरांमुळे स्त्रियांचे जीवन अतिशय खडतर व कष्टप्रद झालेले होते. तिला सर्वस्वी पुरुषांवर अवलंबुन राहावे लागत असे.

• स्त्री शिक्षण :

तत्कालीन समाजात बालविवाहाची प्रथा रुढ असल्यामुळे मुलीचे विवाह ८-९ व्या वर्षीच होत असत. त्यामुळे आई-वडील त्यांच्या शिक्षणाच्या बाबतीत कोणताही विचार करीत नसत. सर्वसामान्य स्त्रिया शिक्षणापासून वंचित होत्या. परंतु राजघराण्यातील, पेशवे आणि मराठा सरदार घराण्यातील स्त्रियांच्या शिक्षणाची सोय केली जात असे. राजघराण्यातील पेशवे आणि मराठा सरदार घराण्यातील स्त्रिया साक्षर होत्या. त्यांना लिहिता वाचता येत होते. पोथी वाचणे, पत्रे लिहीण्याचे ज्ञान त्यांना होते. मराठा राजघराण्यातील राजमाता जिजाबाई, येसूबाई साहेब, महाराणी ताराबाई या स्त्रियांनी लिहीलेली पत्रे उपलब्ध आहेत. गोपिकाबाई पेशवे, आनंदीबाई पेशवे यांना लिहीता वाचता येत होते. हे त्यांनी लिहीलेल्या पत्रांवरुन दिसून येते. त्याचप्रमाणे सरदार घराण्यातील उमाबाई दाभाडे, अहिल्याबाई होळकर यांचीही पत्रे उपलब्ध आहेत. काही राजघराण्यातील व सरदार घराण्यातील स्त्रियांना युध्दकलेचे व प्रशासकीय शिक्षण मिळत असे. मातोश्री जिजाबाई, येसूबाई साहेब, महाराणी ताराबाई यांचा प्रशासनात सहभाग होता. तर गोपिकाबाई, आनंदीबाई यांनीही वेळोवेळी प्रशासनात सहभाग नोंदवून काह आदेश दिलेले आढळतात. तर उमाबाई दाभाडे, अहिल्याबाई होळकर इ. स्त्रियांनी प्रशासनासह युध्दकलेतही नावलौकीक प्राप्त केलेला होता. उमाबाईचा मुलगा अल्पवयीन असल्याने त्यांनी स्वत: सेनापतीपदाची जबाबदारी पार पाडलेली दिसते. यशवंत होळकरांची कन्या भिमाबाई ही घोडेस्वारी व भालाफेकीत निपूण होती.

• निष्कर्ष :-

मराठाकालीन स्त्री जीवनाचा आढावा घेतल्यावर असे आढळून येते की, या ...

स्त्रीचे जीवन असुरक्षित, दु:खी व अनेक बंधनात बंदिस्त होते. तिला कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. बालविवाह, विषमविवाह, केशवपन, बहूपत्नीत्व व सती इ. सारख्या अनिष्ट रुढी परंपरांनी स्त्रीचे जीवन कष्टमय आणि असहाय्य केले होते. या सर्व प्रथा अमानुष व क्रुर होत्या. या प्रथा समाजात खोलवर रुजलेल्या होत्या. त्या काळातील समाजात अज्ञान व शिक्षणाचा अभाव असल्याने समाजातील अंधश्रध्दा व धर्मभोळेपणा यांचा स्त्री जीवनावर खूप मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. या सर्व अनिष्ट प्रथा, रुढी, परंपरांमुळे आपल्या वैयक्तिक भावभावनांना मुरड घालावी लागत असे. धर्माच्या बंदिस्त चौकटीमुळे तिचे कष्टमय जीवन अधिकच खडतर बनलेले दिसून येते. धर्माच्या नावाखालीनवससायास करण्याच्या प्रथेमुळे मुरळी (देवदासी) सारख्या प्रथा समाजात निर्माण होऊन त्यातूनच स्त्रीचे अध:पतन झाले.

सर्व आदर्श निती नियमांचे पालन स्त्रीने केलेच पाहिजे. पुरुषांवर मात्र अशा निती नियमांचे कोणतेही बंधन नव्हते. सर्वसामान्य वर्गातील विधवा स्त्रियांच्या जीवनाचा अपवाद सोडल्यास राजवंशातील, पेशवे व सरदार घराण्यातील स्त्री जीवन पूर्णपणे धार्मिक बंधनात बंदिस्त गुलामांप्रमाणे नव्हते. काही मर्यादित स्वरुपात का होईना, धार्मिक जीवनात त्यांना पुरुषांच्या बरोबरीने सहभागी होऊन त्याचा आनंद उपभोगण्याचे स्वातंत्र्य मात्र मिळत होते. या स्त्रियांपैकी ज्या स्त्रियांना संधी प्राप्त झाली, त्यांनी त्या संधीचे सोने करुन आपल्या कर्तबगारीचा ठसा उमटविलेला दिसून येतो. या स्त्रियांपैकी काहींनी रणांगणावरही अतुलनिय पराक्रम गाजविलेला दिसून येतो. त्यांना फक्त लिहीता-वाचताच येत नव्हते, तर त्या सुसंस्कृत, बुध्दीमान व चतुरही होत्या. मात्र मराठा कालखंडातील सामाजिक जीवनात पुरुषांच्या तुलनेत स्त्रीचा दर्जा दुय्यम होता. स्त्री म्हणुन तिच्या कर्तृत्वाला मर्यादा येत असत. त्यामुळे या स्त्रियांच्या कर्तबगारीची व हुशारीची फारशी दखल घेतलेली दिसून येत नाही. थोडक्यात हिंदू धर्मानेच तत्कालीन समाज जीवनातील स्त्रियांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणून त्यांच्या अंगी परावलंबी, असहाय्य जीवन जगण्याची भावना निर्माण केली, त्यामुळेच स्वत:च्या पायावर उभे राहून स्वावलंबी व स्वतंत्र विचाराने जीवन जगण्याचा अधिकार हिरावून घेतलेला दिसून येतो. हेच कटू सत्य आहे.

• संदर्भ :-

१. Chitnis K. N., Socio-Economic Aspects of Medieval India, Poona, १९७९, Page ११३.

२. भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, पुणे, २०१०, पृ. २३०.

३. कित्ता, भावे वा.कृ., पृ. २३१.

४. सभासद कृष्णाजी अनंत, वाकसकर वि.स. (संपा.) छत्रपति श्रीशिवप्रभूंचे चरित्र, व्हिनस प्रकाशन, पुणे, १९७३, पृ. ७५.

५. पूर्वोक्त, Chitnis K.N., पृ. ११४.

६. पूर्वोक्त, Chitnis K.N., पृ. ११४.

७. पूर्वोक्त, Chitnis K.N., पृ. ११५.

८. पूर्वोक्त, सभासद कृ.अ., वाकसकर वि.स. (संपा.) पृ. ६८-६९.

९. पूर्वोक्त, सभासद कृ.अ., वाकसकर वि.स. (संपा.) पृ. ७५.

१०. सरदेसाई गो.स., मराठी रियासत, उत्तर विभाग, पृ. ८.

११. Chitnis K. N., Socio-Economic Aspects of Medieval India, Poona, १९७९, Page ११६.

१२. चापेकर ना.ग., पेशवाईच्या सावलीत, पृ. ६४.

❑ ❑ ❑

19

# साठोत्तरी काव्
# अस्तित्ववादी

वसंत आबाज
कु. रूपा

प्रत्येकच साहित्यकृती
साजेशी स्थान सहजा सहजी
साधनाला योग्य आकार दे
आगीत तापुन सुलाखुन निघाले
साहित्यीकांपैकी फार
साहित्यलिखणाला साजेसे
घरची परिस्थती साद दिल
साहित्यिक असे आहे की,
तोंड देत साहित्यलिखाणात
आबाजी डहाके हे त्यापैकी
काळातील साहित्यकार
लहान–मोठ्या समस्यांना तों

वसंत आबाजी डह
१९४२ ला विदर्भातील यवत
या लहानशा खेडयात झाल
एकुण आठ मुले झाली
मरण पावली. पाच मुलांपैक

Scanned by CamScanner